आजचा शुभ विचार

“नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-58 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 04 July 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५८ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शुक्रवार, दि. ०४ जुलै २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## राज्यातील सर्व मॉल्सनी अग्निसुरक्षेचे निकष पूर्ण न केल्यास त्यांचे वीज आणि पाणी तोडणार; मंत्री उदय सामंत यांचा इशारा

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

मुंबईतील लिंक स्क्वेअर मॉल (२९ एप्रिल २०२५) व ड्रीम मॉलमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने फायर ऑडिटसंदर्भात कडक पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व मॉल्सचे ९० दिवसांत फायर ऑडिट पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित महापालिकांना दिले जातील. तसेच जे मॉल अग्निसुरक्षेचे निकष पूर्ण करणार नाहीत त्यांची वीज आणि पाणी



जोडणी तोडण्याची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती विधानपरिषदेत उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी दिली. सदस्य कृपाल तुमाने यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. यावेळी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सदस्य अभिजित वंजारी, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला. मंत्री सामंत म्हणाले की, मुंबई महापालिकेने याबाबत आधीच कारवाई सुरू केली असून, ड्रीम मॉल सध्या बंद आहे. फायर सेफ्टीसंदर्भात यापुढे कोणताही निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही आणि राज्यातील सर्व वर्ग 'ब', 'क', 'ड' महापालिकांनी मॉल्सच्या अग्निसुरक्षा अनुपालन तपासावेत. आवश्यकता असल्यास महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण अधिनियम २००६ च्या तरतुदींनुसार कडक कारवाई केली जाईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले

शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

## "बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी संस्थांमध्ये केवळ गुणवत्तेच्या आधारेच प्रवेश", उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधिमंडळात घोषणा

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार असून या संस्थांमधील विद्यार्थ्यांची संख्या, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेबाबत समान धोरण राबविण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य संजय खोडके, अभिजीत वंजारी यांनी 'छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण आणि मानव विकास



संस्थे'कडून (सारथी) घरभाडे भत्ता आणि आकस्मितता निधी वितरणाबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सारथी संस्थेमध्ये २०१८ ते २५ या कालावधीत ८३ अभ्यासक्रमांमध्ये ३ लाख विद्यार्थ्यांना शासनामार्फत विद्यावेतन, शिष्यवृत्ती आदी लाभ देण्यात आले. त्यापैकी ३ हजार म्हणजे केवळ एक टक्का विद्यार्थ्यांनी पीएचडी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला होता. त्या एक टक्का विद्यार्थ्यांसाठी २८० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. पाच वर्षात एका विद्यार्थ्यामागे ३० लाख रुपये खर्च झाला, ही बाब गांभीर्याने घेण्यासारखी आहे. यापुढच्या काळात ज्या अभ्यासक्रमांच्या आधारे रोजगार मिळेल, अशाच अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये विद्यार्थी संख्या, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती यांची संख्या ठरविणे आणि गुणवत्ता वाढ यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल आता प्राप्त झालेला आहे. त्या संदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## भारतीय सैन्याला मिळणार १.०३ लाख कोटी रुपयांची जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे आणि वाहने

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

भारताच्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने १.०३ लाख कोटी रुपयांची शस्त्रे आणि लष्करी उपकरणे खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. यात भूदल, नौदल आणि हवाई दलासाठी आर्मर्ड रिकव्हरी व्हेईकल्स, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सिस्टीम, जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे यांचा समावेश आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने १० संरक्षण साहित्य



खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला प्रोत्साहन देणे आणि भारतीय सैन्य दलांना कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यासाठी कायम सुसज्ज ठेवणे या उद्देशाने ही खरेदी होणार आहे. या खरेदीमुळे शत्रूचा वेगाने आणि प्रभावीरित्या प्रतिकार करण्याची भारतीय सैन्याची क्षमता आणखी वाढणार आहे. भारताचे हवाई संरक्षण आणखी मजबूत होणार आहे. संरक्षण साहित्य निर्मिती ते सैन्याला होणारा पुरवठा यासाठीच्या साखळीचे व्यवस्थापन आणखी प्रभावीरित्या होणार आहे. सैन्यासाठी खरेदी केल्या जाणार असलेल्या संरक्षण साहित्यात पाणसुरुंग शोधून निकामी करणारे जहाज, अत्याधुनिक शस्त्रे, पाण्याखाली प्रभावी काम करणाऱ्या यांत्रिक बोटी, उंचावर शस्त्र ठेवून वेगाने गोळीबार करण्यासाठी आवश्यक साहित्य अशा अनेक आधुनिक संरक्षण साहित्यांचाही समावेश आहे. यामुळे नौदलाच्या जहाजांचे तसेच व्यावसायिक जहाजांचे रक्षण करण्यास मदत होणार आहे

## कुरियरवाला असल्याचे सांगत तरुणीवर बलात्कार प्रकरणी, पोलिसांना तात्काळ कारवाईचे निर्देश

### सोसायट्यांसाठी सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसह नागरिकांना दक्ष राहण्याचे आवाहन

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

कोंढवा येथील उच्चभ्रू आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या गेटेड सोसायटीत एका २५ वर्षीय महिलेवर झालेल्या बलात्काराच्या अमानुष घटनेनंतर विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तांकडे तत्काळ आणि प्रभावी कारवाईची मागणी केली आहे. या घटनेनंतर शहरातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. डॉ. गोऱ्हे यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, दि. २ जुलै २०२५ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास एका गेटेड सोसायटीमध्ये एका व्यक्तीने स्वतःला कुरिअर बॉय म्हणून दर्शवत प्रवेश मिळवला आणि पीडितेच्या घरी जाऊन तिला बेशुद्ध करून तिच्यावर बलात्कार



केला. यानंतर आरोपीने पीडितेच्या मोबाईलवर धमकीवजा मेसेज ठेवून निर्ढावलेपणा दाखवला. डॉ. गोऱ्हे यांनी याप्रकरणी विशेष तपास पथकाची तत्काळ स्थापना करण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली हे पथक कार्यरत करून घटनेचा सखोल तपास केला जावा, असे त्यांनी सुचवले आहे. तसेच, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवून त्याला तात्काळ अटक करण्यात यावी आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत तसेच भारतीय न्याय संहितेतील इतर तरतुदी अंतर्गत गुन्हा दाखल करून अनुभवी विधी अधिकाऱ्यांच्या मदतीने लवकरात लवकर चार्जशीट दाखल करावी, अशी त्यांनी सूचना केली आहे. या घटनेनंतर सोसायटीमधील सुरक्षाव्यवस्थेची त्रुटी स्पष्टपणे समोर आली असल्याने डॉ. गोऱ्हे यांनी सुरक्षारक्षक, रजिस्टर नोंदी व प्रवेश नियंत्रण यंत्रणेची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पुढील काळात अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून त्यांनी सर्व गेटेड सोसायट्यांमध्ये प्रवेश नोंदणी सक्तीची करणे, बायोमेट्रिक किंवा डिजिटल लॉग प्रणाली अनिवार्य करणे आणि महिला सुरक्षेसाठी हेल्पलाइन क्रमांक सोसायटीमध्ये दिसेल अशा पद्धतीने लावणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. तसेच, पोलीस प्रशासनाने “सोसायटी सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे” तयार करून सर्व सोसायट्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करावी, अशीही त्यांनी सूचना केली आहे. ही घटना केवळ एका महिलेवर झालेला अत्याचार न राहता संपूर्ण शहरातील महिलांच्या सुरक्षेला गालबोट लावणारी आहे. म्हणूनच, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अशा घटनांच्या पुनरावृत्तीला आळा बसावा यासाठी तत्काळ आणि कठोर कारवाईची मागणी केली असून पोलीस प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.यासोबतच नागरिकांनी सतर्क राहून पोलिसांना सहकार्य करण्याचे तसेच सर्वच कुरियरवाल्यांना एकाच तराजूत न तोलण्याचे आवाहन करत महिला सुरक्षेसाठी पुरुषी मानसिकतेमध्ये बदलाबाबत देखिल त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

संपादकीय

# गोंधळी नको; विरोधक अभ्यासू हवेत...

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही. शेतकऱ्यांबद्दल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केले होते. या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? 'खाली डोकं वर पाय...' माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे.

लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांना लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकॉर्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते. विधानसभेचे २८८ आमदार आहेत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराला आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याची संधी विधानसभेत मिळायला हवी असते; परंतु असे गोंधळ होत राहिले तर, आमदारांना जनतेच्या समस्यांवर प्रश्न विचारण्याची संधी कशी मिळेल? याचा अन्य सदस्यांनी विचार करायला हवा. आजचे उदाहरण घेऊ या... नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या दालनांपर्यंत जाऊन गोंधळ घालण्याची खरंच गरज होती का? विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले. 'नेमेचि येतो पावसाळा' याप्रमाणे विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदाराने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

# सौ मंजुळाताई गावित यांना साक्री तालुका कांदा उत्पादक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ई-मेल द्वारे दिले निवेदन

## आमदार गावित यांनी पावसाळी अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी आवाज उठवला

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री भारत दिघोळे यांच्या मार्गदर्शनाने साक्री तालुक्याच्या आमदार सौ मंजुळाताई गावित यांना कांदा उत्पादक संघटनेच्या साक्री तालुका पदाधिकाऱ्यांनी ई-मेल द्वारे दिले निवेदन. दि. १ जुलै कृषी दिनाचे अवचित साधून पावसाळी अधिवेशनात साक्री तालुक्याच्या आमदार मंजुळा ताई गावित यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आवाज उठवावा असे आव्हान केले आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी व नाफेड एनसीसीएफ यांनी बाजार समिती मधून ३००० रुपये प्रति क्विंटल कांदा खरेदी करावा. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे पावसामुळे कांद्याचे खूप मोठ्या प्रमाणावर

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना
संस्थापक-भारत दिघोळे

नुकसान झाले आहे त्यामुळे आपण पावसाळी अधिवेशनात आवाज उठवला पाहिजे. जसे की गुजरात राज्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दोनशे रुपये प्रति क्विंटल अनुदान जाहीर केले त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सुद्धा पाचशे रुपये अनुदान जाहीर करावे अशी मागणी करावी व नाफेड यांनी कांदा खरेदी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीतूनच तीन हजार रुपये प्रति क्विंटल खरेदी करावा तसेच "मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन विधानसभेत केले होते त्याची सुद्धा आठवण आपण करून द्यावी असे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार मंजुळा गावित यांच्या निवेदनाद्वारे लक्षात आणून दिले".

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे पदाधिकारी धुळे जिल्हाध्यक्ष श्री संजय भदाणे, युवा अध्यक्ष श्री गंगाधर शिंदे, साक्री तालुका अध्यक्ष श्री अनिल भामरे, व साक्री तालुका उपाध्यक्ष श्री संजय कालेश्वर बच्छाव यांनी साक्री तालुक्याच्या आमदार मंजुळा ताई गावित यांना ईमेलद्वारे निवेदन दिले व दूरध्वनी वरून सुद्धा संपर्क केला व कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा सांगितल्या. आमदार गावित यांनी पदाधिकाऱ्यांना आश्वासित केले की तुमचे प्रश्न शासन दरबारी नक्कीच माडेल व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देईल अशी ग्वाही दिली.

# विचारपुष्प

जगाच्या पाठीवर खूप श्रीमंत लोक आहेत. काही लोकांची श्रीमंती इतकी आहे ते रात्रंदिवस पैसा पैसाच करत बसतात. प्रत्येक ठिकाणी ते पैशाच्या तराजूत इतरांशी व्यवहार करतात. त्यांना त्यांची किंमत कळाली नाही आणि जेव्हा किंमत कळाली तेव्हा हताश नजरेने मागे वळून बघितले तर जीवनामध्ये फक्त पैसा कमावण्यातच हयात घालवली ! पैसा कमवला, पणं चार प्रेमाची माणंस कुठे आहेत ? पैसा ही श्रीमंती अशी आहे स्मशानातल्या लाकडा प्रमाणे तिची किंमत आहे. संसारासाठी पैसा तर कमवलाच पाहिजे. पणं समाज श्रीमंती सुद्धा आपल्याबरोबर असली पाहिजे. आपल्या कळत नकळत कोणीतरी सहज म्हटलं पाहिजे की माझ्या अडचणीच्या वेळेला पाठीमागे राहिलेली हीच ती व्यक्ती ! आणि जेव्हा दुखी व्यक्ति त्यावेळच्या घडलेल्या कथेचं वर्णन करते, इतका मोठा बाका प्रसंग होता पणं साहेबांनी चुटकीसरशी सोडून दिला. एक नया पैशाची अपेक्षा केली नाही. तेव्हा समजावं आयुष्यात मी माणूसकीची श्रीमंती कमावली. संसारात राहून थोडाबहू परमार्थ विवेक विचाराने केला पाहिजे. पैसा हे साधन आहे साध्य नाही. जीवन सफल साध्य करण्यासाठी दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण केले पाहिजे. कधीतरी गोरगरीब आर्तपिडीत यांचे अश्रू पुसले पाहिजे. तेव्हा कुठे समाज गावकी भावकीत चारचौघात बसल्यावर आपल्या बद्दल कौतुकाचा सोहळा मांडतात तीच आपल्या आयुष्याची दिवाळी समजावी

अरविंद सोनवणे,
सटाणा
अध्यक्ष ऊ. बा. ठा.
बागलाण तालुका

# नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी सारखी अनेक गावे अजूनही मुलभूत सुविधांपासुन वंचित का?



भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालेत त्याचबरोबर देशातील २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेशाचा विकास झाला.या राज्यात वेगवेगळ्या पक्षांचे सरकार आलेत आणि गेलेत.परंतू ते हेही सांगायला विसरले नाहीत की आम्ही विकास झपाट्याने केला असे नेहमीच सर्वच राजकीय पक्ष छाती ठोकून सांगतात. आपण महाराष्ट्राचा विचार केला तर अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु प्रत्येक राजकीय पक्ष स्वतःची पाठ थोपटण्यात अग्रेसर राहाला.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.आज महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन ६५ वर्षे झालीत.परंतू आजही राज्यातील अनेक भागांत मुलभूत सुविधांपासुन अनेक लोक वंचीत आहेत.त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे नंदुरबार जिल्हातील केलखाडी गाव.आजही सरकार अती दुर्गम भागात पोचलीच नाही;जर पोहचली असेलही परंतु तेथील विकासाकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे चित्र नंदुरबार जिल्हातील केलखाडी (ता.अक्कलकुवा) येथील भयावह परिस्थिती वरून लक्षात येते.नंदुरबार जिल्ह्यातील आमदार खासदार,पालकमंत्री अशा उच्च पदस्थ लोकप्रतिनिधींना अशा गंभीर समस्या कशा काय दिसत नाही? किंवा दिसल्या नाहीत? मतदारांकडे मतदान मांगतांना या गावात कोणीच गेले नसेल का?गेले असेल तर फक्त स्वार्थापोटी गेले असावेत ही बाब तेथील गंभीर परिस्थितीवरून सर्वांच्याच लक्षात येते. नंदुरबार जिल्ह्यातील केलखाडी ता.अक्कलकुवा येथील पूल नसल्याने परिसरातील डोंगरपाड्यावरील विद्यार्थ्यांना दररोज झाडाच्या फांदीवरून दोरीच्या सहाय्याने तोल सांभाळुन जीव धोक्यात घालत पलीकडच्या जिल्हापरिषद शाळेत जावे लागते.या गावात ४०० लोकांची वस्ती आहे स्वतंत्रपूर्व काळापासून तेथे रस्ता नाही ही किती मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.आज औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत आहे अशा परिस्थितीत डोंगराच्या पायथ्याशी किंवा शेजारी राहणाऱ्या गावकऱ्यांना आपला जीव धोक्यात टाकून जगावे लागत आहे ही विकसित महाराष्ट्राची शोकांतिकाच म्हणावी लागेल.आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात पाऊसाने थैमान घातले आहे अशा परिस्थितीत नंदुरबार जिल्हातील केलखाडी ता.अक्कलकुवा येथील नदीवर पूल नसल्याने तेथील परिसरातील डोंगरपाड्यावरील विद्यार्थ्यांना दररोज जीव धोक्यात टाकून शिक्षणासाठी झाडाच्या फांदीवरून दोरीच्या सहायाने शाळेत जावे लागत आहे.म्हणजे शिक्षणासाठी चिमुकल्यांना कीती मोठा धोका पत्करावा लागत आहे ही बाब नंदुरबार जिल्हातील केलखाडी गावातील जिवंत उदाहरण महाराष्ट्रासह देशासमोर आहे. विद्यार्थी तसेच ग्रामस्थांना केलखाडी गावात येण्यासाठी आधी डोंगर उतरून नदीकाठावर यावे लागते.त्यानंतर झाडाच्या फांदीवरून नदी पार करावी लागते.तेथील ग्रामस्थ म्हणतात की आमच्या पाड्यापर्यंत जाण्यासाठी धड रस्ता नाही.पलीकडे केलीपाडा येथे जाण्यासाठी नदीवर पूल नाही.त्यामुळे जीवघेणी कसरत रोजचीच झाली आहे.रस्ता आणि पुल बांधण्यासाठी ग्रामस्थ अनेक वर्षांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा करून मागणी करीत आहेत मात्र अजूनही ग्रामस्थांना प्रशासनाकडुन दाद मिळाली नाही याचे दुःख आजही त्यांना होत आहे.२० फूट खोल केलखाडी नदी व २४ फूट लांब झाडांचा रस्ता किती भयानक व कठीण परिस्थिती म्हणावी लागेल.मी या लेखाच्या माध्यमातून सरकारला व पक्ष-विपक्षांना आग्रह करतो की सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे जर माझा आवाज या लेखाच्या माध्यमातून आपणापर्यंत पोहचला असेल तर आपण ताबडतोब नंदुरबार जिल्हातील केलखाडी गावात जाऊन तेथील संपुर्ण परिस्थिती युध्दपातळीवर हाताळावी जेणेकरून तेथील ग्रामस्थांना व चिमुकल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दिलासा मिळु शकेल व त्यांचे जीवन आनंददायी होईल.त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्री, स्थानिक प्रशासन, सरकार, आमदार -खासदार यांनी अती दुर्गम भागांची पहाणी करावी व संपूर्ण मुलभूत सुविधांची पूर्तता करून तेथील ग्रामस्थांना विकासाच्या प्रवाहात आणावे ही माझी सरकारला कळकळीची विनंती आहे.केलखाडीतील ग्रामस्थ व विद्यार्थी म्हणतात सांगा,आमची शाळेत जाण्याची समस्या कोणत्या भाषेत सांगावी! त्यामुळे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पुन्हा विनंती करतो की अशा दुर्गम भागाकडे आपण जातीने लक्ष द्यावे जेणेकरून तेथील ग्रामस्थांना दिलासा मिळेल.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर.

# डॉक्टर डे निमित्त देगलूर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने सन्मान

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत



डॉक्टर डे निमित्त उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा पत्रकार संरक्षण समिती, देगलूर यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. समाजाच्या आरोग्य रक्षणासाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर, डॉ. मलशेटवार, डॉ. उस्मान सर, डॉ. काझी, डॉ. नुकुलवाड, डॉ. सचिन गायकवाड तसेच इतर डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन्मान समारंभात डॉक्टरांना शाल व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पत्रकार संरक्षण समितीचे तालुकाध्यक्ष शेख असलम यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "डॉक्टर हा समाजातील खरा आधारस्तंभ आहे. विशेषतः कोरोना काळात डॉक्टरांनी जीव धोक्यात घालून समाजाची सेवा केली आहे. अशा सेवाभावी व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करताना आम्हाला अभिमान वाटतो." कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी पत्रकार संरक्षण समितीच्या या उपक्रमाचे कौतुक करत, संपूर्ण टीमचे आभार मानले आणि भविष्यातही असे उपक्रम राबवत राहावेत, अशी शुभेच्छा दिल्या. या वेळी पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शेख असलम, सचिव गजानन टेकाळे, कार्याध्यक्ष धनाजी देशमुख, सहकार्याध्यक्ष धनाजी जोशी, संघटक श्वेता चिदमलवाड, सहसंघटक प्रभु वंकलवार, सदस्य इस्माईल खान, शेख अफन आदी उपस्थित होते.

# धुळे जिल्हयाच्या नव्या राजकीय नेतृत्वाची फळी कुणालबाबांच्या प्रवेशाने बनली भक्कम

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

धुळे जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक तसेच सहकार क्षेत्रात गेली ५० वर्ष दबदबा राखणार्या स्वर्गिय रोहिदास पाटील साहेब यांचे राजकीय वारसदार आणि धुळे ग्रामीणचे माजी आमदार कुणालबाबा पाटील यांचा काल भारतीय जनता पक्षात झालेला जंगी प्रवेश सोहळा अवघ्या खान्देशासाठीच नव्हे तर संपुर्ण राज्यात चर्चेचा आणि उत्सुकतेचा विषय ठरला.

प्रदेश कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष आणि युवा नेतृत्व म्हणून कॉंग्रेस हायकंमाडच्या जवळ असलेल्या कुणालबाबांचे भाजपात स्वागत करण्यासाठी राज्यातील भाजपा नेते झाडून प्रवेश सोहळयाला हजर राहिले. धुळे, नंदुरबार आणि जळगाव जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील विविध ठिकाणचे अनेक आमदार, खासदार कुणाल पाटलांचे भाजपात प्रवेश करीत असल्याचे साक्षीदार झाल्याचे संपुर्ण महाराष्ट्राने काल वृत्त वाहिन्यांच्या लाईव्ह प्रसारणाव्दारे पाहिले. हा सर्व तामझाम कुणाल पाटील यांच्या राजकीय वलयाचे आणि त्यांच्या संस्थात्मक प्रस्ताचे



महत्व अधोरेखीत करणाराच ठरला.

कुणाल पाटील, भाजपात येणार.. येणार... येणार.. असा जो गेली सात-आठ वर्ष चर्चेचा सिलसीला सुरु होता तो नेमका कशासाठी याचे उत्तर कालच्या प्रवेश सोहळयाने दिले. भारतीय जनता पक्षाला खान्देशातील एकाहून एक मातब्बर नेते गळास लावण्यासाठी जेमतेम काही दिवस, महिने लागले. मात्र कुणाल पाटील यांना भाजपात आणण्यासाठी तीन विधानसभा आणि दोन लोकसभा निवडणुका प्रतिक्षा करावी लागली. यात कुणाल पाटील यांच्या रंवदळे-पाटील घराण्याची राजकीय, वैचारीक निष्ठा किती घट्ट होत्या, किती प्रगल्भ आणि दूरगामी एकनिष्ठता या कुटूंबाच्या अंगी आहेत हेच दाखवून देणारे ठरले आहे. तीन पिढ्यांचा कॉंग्रेस पक्षाचा वारसा कुणाल पाटील यांनी माजी मंत्री स्व.रोहिदासजी पाटील यांच्या आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत जपला.

आता कुणालबाबा स्वतंत्रपणे नव्या विचारांचे आणि नव्या राजकीय परिघाचे शिलेदार म्हणून धुळे जिल्ह्यातील नव्या दमाचे नेतृत्व म्हणून भारतीय जनता पक्षात सामिल झाले आहेत. कुणाल पाटील यांचे राजकारण नवीन पध्दतीचे असेल, नव्या उमेदीचे असेल आणि नव्या विकासाच्या मार्गाने जाणारे असेल. मागिल काळात झालेला राजकीय पाडापाडीचा इतिहास बाजूला सारुन कुणालबाबा नव्या समिकरणांसह, नव्या सहकार्यांच्या आणि सामोपचाराच्या भुमिकेतून पुढे जातील. अशीच चर्चा त्यांच्या हितचिंतकांमध्ये सुरु आहे.

धुळे जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाची भक्कम फळी यामुळे भारतीय जनता पक्षात निर्माण झाली असल्याचेही कुणालबाबा यांच्या प्रवेशामुळे म्हटले जात आहे. पालकमंत्री जयकुमारभाऊ रावल, आमदार अनुपभैय्या अग्रवाल, आमदार राम भदाणे यांच्या सोबतीला मा.आ.कुणाल पाटील यांच्या रुपात भारतीय जनता पक्षाची नवी उमदी नेतृत्वाची फळी भाजपात तयार झाल्याचे आज तरी दिसते आहे.

या नव्या नेतृत्वाने विकासाचीच भाषा करावी! जे ते आज करत आहेतच. धुळे जिल्ह्याचा विकासाचा बॅंकलॉग मोठा आहे. धुळे जिल्हा नाशिक, जळगाव, संभाजीनगर, अहिल्यादेवी नगर जिल्ह्यापेक्षा मागे आहे, ही सल या नेत्यांच्या बोलण्यात कायम जाणवते. धुळे जिल्हाच नव्हे तर संपूर्ण खान्देशाला विशाल खान्देश म्हणून घडवण्याचे स्वप्न स्वर्गिय रोहिदासजी पाटील बघायचे. त्यासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी ते सातत्याने राज्य आणि केंद्रीय नेतृत्वाकडे करायचे. विकासाचे तेच स्वप्न मा.आ. कुणाल पाटील यांनी सुध्दा पाहिले असून कालच्या प्रवेशावेळी त्यांनी आवर्जुन मांडले. मला काही नको पण माझ्या धुळे जिल्ह्याचा विकास घडावा, खानदेशाचा सर्वांगीण विकास व्हावा, आम्ही खूप समाधानी लोक आहोत, माझ्यामुळे कोणा पदाधिकार्याला अडचण होईल असे वागणार नाही. आम्हाला फक्त सन्मानाने वागवा, जनतेचे प्रश्न सोडवा. अशीच मागणी कुणालबाबांनी भाजप नेतृत्वाकडे केली. यातूनच कुणालबाबांचा लवचिकपणा स्पष्ट झाला, हीच राजकीय लवचिकता कुणाल पाटील यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते आणि तीच त्यांना भाजपच्या वरीष्ठ नेतृत्वाच्या विश्वासात भरण्यास उपयोगी ठरेल. धुळे जिल्ह्याला त्यांच्या प्रवेशाचा अधिक लाभ होईल. हीच यानिमित्ताने अपेक्षा व्यक्त करीत आहोत.

# नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेची एक रकमी कर्ज परतफेड योजना शेतकऱ्यांना मान्य नाही बिंदू शेठ शर्मा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------

याबाबत सविस्तर वृत्त असे की, चार जुलै रोजी नाशिक येथे कालिदास कला मंदिर सभागृहात नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नवीन योजना २०२५ ,/२६ साठी लागू करण्यास राज्य शासनाने २३ एप्रिल रोजी मुंबई येथे अजित दादा पवार अध्यक्षतखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्तबँकेस पाठवून सर्वसाधारण सभा घेऊन त्या योजनेस सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घ्यावी व त्यानंतर ही योजना लागू करावीव यायोजने संदर्भात थकबाकीदार शेतकऱ्यांचे मते जाणून घ्यावेअसे आदेश दिले आहेत त्या आदेशानुसार या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे

या सर्वसाधारण सभेच्या आधी आज एक जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटनेचे पदाधिकारी बैठकीसाठी बोलविण्यात आली




होती या बैठकीत एक मताने ठराव मांडण्यासाठी आज बैठक आयोजित करण्यात आली होती व या बैठकीत जिल्हा बँकेने काढलेले परिपत्रकाचे वाचन करण्यात आले व या परिपत्रकानुसार शेतकऱ्यांचे मते जाणून घेतली यावेळी चर्चा करण्यात आली सर्व शेतकरी नेते व थकबाकीर शेतकऱ्यांनी ओटीएस योजना लागू करावी मात्र शेतकऱ्यांना संपूर्ण व्याज शासनाने भरावे. तसेच आमची कर्जमाफीची मागणी कायम असून शासनाने कर्जमाफी केल्यास जे शेतकरी कर्जाचे पैसे भरतील यांचे पैसे राज्य शासनाने आणि बँकेने शेतकऱ्यांच्या कर्ज खाती किंवा शेतकऱ्यांच्या सेविंग खाती जमा करावेत अशी मागणी या बैठकीत करण्यात आली ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त केलेले आहेत त्या शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी जप्त केलेल्या व लावलेली नावे आहेत ते काढून त्या ठिकाणी शेतकऱ्यांची नावे पुन्हा लावण्यात यावीत व बँकेने सक्तीची कर्ज वसुली सुरू केलेली आहे व शेतकऱ्यांची नावे लावण्यात येत आहेत ते तात्काळ थांबविण्यात यावे अशी मागणी या बैठकीमध्ये करून याचे तसे पत्र बँकेस देण्यात यावे मयत सभासदां नाही व्याज माफ करून कर्ज भरण्यासाठी त्यांच्या वारसांना मुद्दलाचे १० हप्ते करून द्यावेत शेतकऱ्यांना व्याजाकारताना उचल तारखेपासून व्याजा करावे सर्व थकबाटदार शेतकऱ्यांना आपली मते मांडण्यासाठी या बैठकीस उपस्थित राहू द्यावे ज्या शेतकऱ्यांचे खाते शील केले असतील ते खाते ओपन करावे यावयाची इतर मागण्या संदर्भात चर्चा करून या संदर्भात बँकेत तात्काळ पत्र घेण्यात यावे असे या बैठकीत ठरविण्यात आले या बैठकीमध्ये बिंदूशेठ शर्मा, प्रकाश शेठ शिंदे ,अर्जुन बोराडे, भगवान बोराडे ,दिलीप पाटील, रामराव मोरे, खेमराज कोर , बाळासाहेब बोरस्ते, रमेश बोरस्ते यांनी आपली मते मांडले

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

## मामा परमानंद जयंती विशेष

# पत्रकारितेचे व्रती-तपी: मामा परमानंद!

नारायण महादेव उर्फ मामा परमानंद यांचे संपादकीय कौशल्य वाखाणण्याजोगे होते. राज्याकारभारविषयक प्रश्न समतोलपणे व योग्य प्रमाणात हाताळण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. जनतेच्या अडचणींची चौकशी करून त्याचा निर्भीडपणे पाठपुरावा केला जाई. प्रश्नाचा निट विचार करून, त्याच्या सगळ्या बाजू समजून, त्यावर मोजक्या शब्दात पण ठामपणें मतप्रदर्शन करणे, अशी त्यांची भूमिका असे. पत्रकारितेचे हे व्रत त्यांनी कुठलीही अपेक्षा न ठेवता स्वीकारले होते. न्यायमूर्ती रानडे त्यांचा उल्लेख आमचे राजकीय ऋषी, असा करत. त्यांच्याबद्दल महत्त्वपूर्ण संकलित माहिती श्री एन. के. कुमार से.नि.अध्यापक देताहेत...

मुंबईतील नामवंत कायदेपंडित रावसाहेब विश्वनाथ मांडलिक यांना लेखनाची विशेष आवड होती. परंतु त्यांच्याकडे वृत्तवत्र चालवण्याइतपत भाग-भांडवल नव्हते. आपला मानस बोलून दाखवताच दादाभाई नौरोजीनी मदतीचे आश्वासन दिले. या पत्राची आर्थिक बाजू मंडलिक आणि कृष्णाजी मुलजी यांनी स्वीकारली. संपादकीय जबाबदारी नारायण महादेव उर्फ मामा परमानंद यांच्यावर सोपवण्यात आली. अशा रीतीने नेटिव्ह ओपिनियनचा पहिला अंक दि.४ जानेवारी १८६४ रोजी प्रसिद्ध झाला. याची पूर्ण संपादकीय जबाबदारी मामा परमानंद यांच्यावरच होती. दोनशे रुपये महिना पगारावर त्यांची नियुक्ती झाली. दोन वर्षे इंग्रजीतून निघाल्यानंतर दि.१ जुलै १८६६पासून हा अंक मराठीतूनही निघू लागला. युरोपियन आणि नेटिव यांच्यातील गैरसमज दूर करण्यासाठी हे पत्र सुरू झाले. हिंदी राजकारणाचा त्यांना सखोल अभ्यास होता. महाराज सयाजीराव गायकवाड, सर विल्यम वेडरबर्न, रानडे, तेलंग, चंदावरकर, मलबारी, मोतीलाल घोष वगैरे ख्यातनाम मंडळी त्यांचा सल्ला घेत असत. साधुशील-सत्प्रवृत्तीचे मामा मुंबई प्रार्थनासमाजाचे एक ध्येयनिष्ठ, निष्ठावंत व समर्पित कार्यकर्ते होते. बिछान्यास खिळून असतानाही त्यांनी शेवटपर्यंत सुबोध पत्रिकेसाठी लेखन केले. ते एक कृतिशील धर्मी व समाजसुधारक होते. धर्म सुधारल्याशिवाय आपल्या देशाची सर्वांगीण उन्नती होणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते. बेन्जामिन फ्रँक्लिनच्या चरित्राचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. न्या.रानडे यांनी त्यांना राजकीय ऋषी या महनीय पदवीने गौरविले. मामांचा अवघा संसार परमार्थावर आधारलेला होता. त्यांचे घर म्हणजे विद्यार्थ्यांचे आश्रयस्थान, अनेक परस्थ थोर थोर पुढाऱ्यांच्या व पाहुण्यांच्या वर्दळीचे ठिकाण व पुनर्विवाहितांचा आश्रम असेच होते. त्यांच्या पत्नी जानकीबाई यांनी सहधर्मचारिणी या नात्याने त्यांना अखेरपर्यंत चांगली साथ दिली. मामांचा स्वभाव प्रसिद्धीविन्मुख व सोशिक होता.

मामा परमानंद हे प्रार्थना समाजाचे एक संस्थापक व संवर्धक होते. त्यांचा जन्म दि.३ जुलै १८३८ रोजी कोकणात सावंतवाडी नजिकच्या माणगाव या खेड्यात झाला. त्यांचे संपूर्णनाव नारायण महादेव परमानंद; तथापि मामा परमानंद याच नावाने ते प्रसिद्ध आहेत. मामांचा जन्म झाल्यावर वडील महादेव दुसऱ्या वर्षीच वारले. आई गंगाबाई हिने तिच्या भावाच्या मदतीने असलेले दुकान चालवून मामांचे प्राथमिक शिक्षण केले. दहाव्या वर्षी मामा मुंबईस बहिणीकडे गेले असताना त्यांची हुशारी व महत्त्वाकांक्षा पाहून त्यांचे मेहुणे कृष्णशेट तिरवेकर यांनी पुढील शिक्षणार्थ त्यांना मुंबईसच ठेवून घेतले. पूर्वी अत्यंत गरिबीत झालेले अर्धवट मराठी शिक्षण पूर्ण करून मामा सरकारी सेंट्रल स्कूलमध्ये चार वर्षे शिकले. पुढे कॉलेजातही गेले. मेहनती व जात्याच बुद्धिमान विद्यार्थी असल्यामुळे त्यांनी अनेक शिष्यवृत्त्या मिळवून पहिल्या वर्गातील स्कॉलर म्हणून लौकिक संपादन केला. मुंबई विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर मॅट्रिकची परीक्षा देऊन ते बीए परीक्षेसही बसले होते; पण आर्थिक अडचणीमुळे त्यांना शिक्षण सोडावे लागले आणि एल्फिन्स्टन हायस्कुलात शिक्षकाची नोकरी धरावी लागली. तेथे उत्कृष्ट शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यांच्या हाताखाली नामवंत अनेक विद्यार्थी तयार झाले. उदा- प्रसिद्ध संशोधक काशिनाथपंत तेलंग हे त्यांचेच विद्यार्थी होत. पुढे सिंधमध्ये बदली झाली, तिकडेही त्यांनी उत्तम काम केले; पण हवा न मानवल्यामुळे मुंबईसच यावे लागले. शिक्षकी पेशा सोडून वृत्तपत्र संपादन व लेखन या सार्वजनिक क्षेत्रात त्यांनी आमरण मोठे यश व कीर्ती मिळविली. इंदुप्रकाश, नेटिव ओपिनिअन, इंडियन स्पेक्टॅटर व विशेषतः सुबोध पत्रिका- मुंबई प्रार्थना समाजाचे मुखपत्र या वृत्तपत्रांची जबाबदारी अंगावर घेऊन ती निर्भीड व निःस्पृहपणे पार पाडली. मामांचे इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व होते. त्यांचे लेखन सुबोध, चटकदार, मार्मिक व निश्चयात्मक मते मांडणारे होते.

दैनंदिन राजकीय घडामोडींवरील त्यांची टीका भारदस्त व न्यायनिष्ठुर असे. तत्कालीन अनेक भ्रष्टाचारी प्रकरणांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला; यूरोपिअन अंमलदारांचा देखील बेबंदपणा त्यांनी उघडकीस आणला व हाच रोष त्यांना सरकारी नोकरीत नडला. संस्थानी कारभार व त्याची सुधारणा यावरही मामांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिले. कच्छच्या संस्थानिकाने त्यांना नायब दिवाण नेमले. तेथील गुंतागुंतीचा कारभार मामांच्या सरळ, शांत व सभ्य स्वभावाला मानवला नाही आणि राजीनामा देऊन ते मुंबईस परत आले. हिंदी लोकांचे मित्र व हितचिंतक सर विल्यम वेडरबर्न हे मामांची योग्यता व कार्यक्षमता जाणणारे होते. त्यांनी ते मुंबई उच्च न्यायालयात प्रबंधक असताना मामांना उपप्रबंधक म्हणून नेमले. पुढे त्यांनीच मामांना मजूर खात्याचे सेक्रेटरी केले. नंतर मामा महसूल व सामान्य खात्याचे अधिक्षक देखील झाले. पण कामाच्या ताणामुळे त्यांची प्रकृती बिघडली व शेवटपर्यंत त्यांना घरीच बिछान्यावर खितपत पडून रहावे लागले.

तरुणास उपदेश-पितृबोध, त्याच्या इंग्रजी, मराठी व गुजराती भाषेतही आवृत्त्या निघाल्या. मामांची एका संस्थानिकास बारा पत्रे- मूळ इंग्रजी १८९१- मराठी भाषांतर १९६३, एच्ए, ॲक्वर्थ यांना मराठी पोवाडे संकलित करण्याच्या कामी त्यांनी बहुमोल सहकार्य केले. त्यांचा उपलब्ध असलेला इंग्रजी व मराठी पत्रव्यवहार आजही महत्त्वाचा आहे. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मामांची योग्यता व कार्य चांगले जाणले होते. महात्मा जोतीराव फुले यांच्या शेवटच्या आजारात आर्थिक साह्य मिळावे, म्हणून बडोदे सरकारला मामांनी लिहिलेली पत्रे फुलेंच्या चरित्रावर व कार्यावर चांगला प्रकाश टाकणारी ठरली आहेत. सर्व वर्ग व सर्व थरांतील समकालीन मोठमोठ्या कर्त्या पुढाऱ्यांचे ते सल्लागार होते. मुंबईस त्यांच्या राहत्या घरी वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी दि.१३ सप्टेंबर १८९३ रोजी त्यांचे देहावसान झाले. त्यावेळी मित्र व सहकारी डॉ.रामकृष्ण भांडारकर, शांताराम विठ्ठल, तुकाराम तात्या, नारायण चंदावरकर, भास्कर हरि भागवत, श्रीधरपंत भांडारकर वगैरे जीवाभावाची मंडळी सभोवती जमलेली होती.

!! जयंतीच्या पावन पर्वावर
विनम्र अभिवादन !!

--------------------------------

श्री एन. के. कुमार
से.नि.अध्यापक
गडचिरोली

# मुंडीपार येथे सिमेंट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन संपन्न

## नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण, मूलभूत सुविधा मिळण्याची अपेक्षा पूर्णतेकडे

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------

गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार ग्रामपंचायत हद्दीतील वार्ड क्रमांक २ मधील आखरटोली परिसरात कोहमारा रोड ते ममता ताई धमगाये यांच्या घरापर्यंतच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन आज उत्साहात पार पडले. या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम समितीचे सभापती मा. डॉ. लक्ष्मणजी भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मुंडीपार ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. प्रेमलता ताई राऊत,



ग्रामपंचायत सदस्य श्री. चंद्रशेखरजी शहारे, राजा भाई खान, प्रलयजी धमगाये तसेच रोहित पांडे, सुनील वाघाडे, अजय नेवारे, शिवा बिसेन, राहुल राऊत, राजु भोयर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांत मोठ्या प्रमाणावर समाधानाची भावना निर्माण झाली असून नागरी मूलभूत सुविधांच्या दृष्टीने ही कामगिरी महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन डॉ. भगत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला असून परिसरात विकासाचे सकारात्मक वारे वाहू लागले आहेत. नागरिकांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# ४ जुलै स्वामी विवेकानंद पुण्यतिथी

## स्वामी विवेकानंद जगाच्या पाठीवरील तेजस्वी युगपुरुष

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब, दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा अवगत केलेल्या होत्या.म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दु:खावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.११ सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला.त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात "बंधु व भगिनी"असे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय! आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले.त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी. मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वत:ची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदु:खाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.१८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला.अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले.असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.परंतु अचानक ४ जुलै १९०२ ला ३९ व्या वर्षी स्वामींची प्राणज्योत मालवली व भारतासह जगातील अनेक राष्ट्रांना धक्का बसला.कारण स्वामी अल्प वयात आपल्याला सोडून गेले आणि ज्ञानाची तेजस्वी जोत मावळली.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे आज सर्वांनाच वाटते.त्यामुळे आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या ह्रदयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल.जोपर्यंत सुर्य, चंद्र, तारे, आकाश-पाताळ,ग्रह-तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच ह्रदयात राहिल.स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त सरकारने, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यायासह संपूर्ण युवावर्गानी आजच्या दिवशी वृक्षलागवड केली पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण मानव जातीला आणि प्राणीमात्रांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे अनेकांचे प्राण आपल्याला वाचविता येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात व जळामुळात आपल्याला स्वामींचे दर्शन अवश्य होईल.स्वामीच्या पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत मुलिकादेवी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



पारनेर तालुक्यातील श्री मुलिकादेवी माध्यमिक, उच्च माध्यमिक व तंत्र विद्यालय यात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इ.६ वी व इ .७ वी ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा घेण्यात आली .या परीक्षेत इ ६वी मध्ये ८५ विद्यार्थी बसले त्यापैकी ४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.इ.६वी चा शेकडा निकाल ५८.३३ टक्के लागला तर इ .७ वी ८४ विद्यार्थी परीक्षेस बसले त्यापैकी ६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि शेकडा निकाल ७७.११ टक्के लागला.इ ६वी मध्ये कु. पवार सानिका रमेश या विद्यार्थीनीने ३०० पैकी २८६ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ४ था क्रमांक मिळवला तर लाळगे आदित्य नवनाथ या विद्यार्थ्याने ३०० पैकी २८० गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ७ वा क्रमांक मिळवला .तसेच इ.७वी मधील चि. स्वराज सत्यवान लंके याने ३०० पैकी २९४ गुण मिळवून जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकवला तर कु .अलिया महेबूब इनामदार हिने ३०० पैकी २९२ गुण मिळवून जिल्ह्यात ३ रा क्रमांक मिळवला आणि कु .अलिना इलियास मोमीन हिने ३०० पैकी २७६ गुण मिळवून जिल्ह्यात ११ वा क्रमांक मिळवला हे सर्व गुणवंत विद्यार्थी ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा शिष्यवृत्ती साठी पात्र ठरले आहेत.तसेच इयत्ता ६वी मधील कु.प्रार्थना सचिन जाधव या विद्यार्थिनीला चांगले गुण मिळून या परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. अ. नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे साहेब,उपाध्यक्ष विवेक भापकर साहेब, सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंतराव वाघ साहेब,कोषाध्यक्ष ॲड.दिपलक्ष्मी म्हसे पाटील, जेष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे पाटील, जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी साहेब, विश्वस्त राहुल झावरे पाटील यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे , उपप्राचार्य कैलास मोकळे , पर्यवेक्षक लक्ष्मण झंजाड आणि सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे गुणपत्रक व प्रशस्ति पत्रक ट्रॉफी देऊन अभिनंदन केले. तसेच निघोज ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य,सोसायटी चे चेअरमन, व्हा. चेअरमन, सदस्य, तंटा मुक्ती समिती चे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व समस्त गावकऱ्यांनी या गुणवंत विध्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यालयातील दादासाहेब ठवाळ, बाबाजी शिंदे,सुनताज इनामदार, प्रिया लहारे, प्रवीण आवारी, अरुण काळे, गणेश बारामते, अनिता काळे, या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

# ११ वी ऑफलाईन प्रवेश प्रकीयेचा पर्याय खुला करावा:आ.अंतापूरकर

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. संबधित विभागाच्या अनागोंदी नियोजनामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जात असून, या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत सरकारने तात्काळ ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेचा पर्याय खुला करावा," अशी जोरदार मागणी देगलूर-बिलोलीचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्यातून केली.

आ. अंतापूरकर यांनी सभागृहात स्पष्ट केले की, " मतदारसंघातील दहावी उत्तीर्ण होणाऱ्यांची टक्केवारी लक्षणीय असूनही अनेक विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता येत नाही. पोलिटेक्निक, आयटीआय, नर्सिंग, शेती शाखांतील पदविका व पदवी अभ्यासक्रम पूर्ण करूनही रोजगार मिळत नसल्याने विद्यार्थी आता पारंपरिक कला, वाणिज्य व विज्ञान शाखांत पदवी शिक्षणाकडे वळत आहेत. परंतु ११ वीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करताना वेबसाईट स्लो होणे, अनेक वेळा क्रॅश होणे, तसेच विहित कालमर्यादा ओलांडणे या तांत्रिक अडचणी समोर येत आहेत."

"ग्रामीण भागात अद्यापही दर्जेदार इंटरनेट सेवा नाही, विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रक्रिया समजत नाही आणि संगणकीय कौशल्याचा अभाव आहे. अशा स्थितीत शासनाने ग्रामीण भागात किमान ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेस परवानगी द्यावी, " अशी मागणी करत आ. अंतापूरकर यांनी शासनाने तात्काळ निर्णय घेऊन विद्यार्थ्यांचे नुकसान थांबवावे, असे स्पष्ट केले.

# मराठी पत्रकार परिषदेच्या भगवंतराव इंगळे स्मृती पुरस्काराने अमळनेर येथील ज्येष्ठ पत्रकार पांडूरंग पाटील ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या हस्ते सन्मानित

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



अमळनेर- येथील ज्येष्ठ पत्रकार पांडुरंग पाटील यांना काल आझाद मैदानाजवळील मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात माजी खासदार राष्ट्रवादीचे संस्थापक अध्यक्ष नेते महाराष्ट्राचे 'जाणता राजा' शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते अकोला येथील पत्रमहर्षि भगवंतराव इंगळे यांच्या नावाचा प्रतिष्ठेचा स्मृती पुरस्कार सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. नरेंद्र जाधव, ज्येष्ठ पत्रकार विचारवंत मधुकर भावे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, महेश म्हात्रे, ज्येष्ठ नाट्यकर्मी भरत जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलींद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या अध्यक्षा शोभा जयपुरकर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष राजाभाऊ आदाटे, परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सुरभाई शेख, डिजीटल मिडीयाचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे आदी मान्यवरांची उपस्थित होती.

पांडुरंग पाटील यांच्या नि:स्पृह व विधायक पत्रकारितेचा संयोजक व उत्कृष्ट सुत्रसंचालक व परिषदेचे उपाध्यक्ष आयबीएन लोकमतचे विशाल परदेशी यांनी आपल्या निवेदनात विशेष उल्लेख केला. यावेळी ज्येष्ठ विचारवंत मधुकर भावे यांचे चरण स्पर्श करण्यासाठी पांडुरंग पाटील हे गेला असता त्यांनी ओळखले व नाव घेऊन शुभाशिर्वाद देत 'लोकमत' मधील अमळनेरच्या त्यांच्या बातमीदारीची विशेष आठवण दिली. ७० वर्षीय पांडूरंग पाटील हे उच्चविद्याविभूषित असून ५० वर्ष प्रदिर्घ पत्रकारितेचा त्यांचा अनुभव आहे. त्यांनी धुळे येथील 'स्वतंत्र भारत' पासून आपल्या पत्रकारितेची सुरुवात केली. त्यानंतर 'आपला महाराष्ट्र', 'वार्ता', 'दैनिक लोकमत', स्वत:चे साप्ताहिक 'दिनानाथ' सह सध्या 'दैनिक पुण्यप्रताप' चे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. शेतकरी, कामगारांचे प्रश्न राजकारण समाजकारण, शैक्षणिक तसेच सगळ्या विषयांचे स्फूट लिखाणातून ते सिद्ध केले आहे. हा पुरस्कार त्यांनी त्यांच्या पत्नी सौ. विजया पाटील, मुले नंदकिशोर, हेमेंद्र या परिवारासह राज्यभरातून आलेल्या पत्रकारांच्या उपस्थितीत स्विकारला. या दिमाखदार, देखणा व अप्रतिम बहारदार सत्कार समारंभ सोहळ्यास खान्देशातून जळगावच्या दैनिक पुण्यप्रतापचे संपादक भाऊसाहेब विवेक पाटील अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष गो. पि. लांडगे, धुळे नंदुरबार एकसंघ जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष बापू ठाकूर, धुळे येथील 'सा. जागृतीपर्व' चे संपादक दत्ताजी बागुल यांनी उपस्थित राहून पांडुरंग पाटील यांना शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल पांडूरंग पाटील यांचे अमळनेर सह संपूर्ण खान्देशातून विविध स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# रावणगाव पुनर्वसनची कामे बोगस करणाऱ्या गुत्तेदारावर फौजदारी दाखल करण्याची मागणी

राज रावणगांवकर
हडपसर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



रावणगाव खानापुर पुनर्वसन येथील नागरी सुविधा व क्षतीग्रस्त कामांबाबत वेळोवेळी सांगितल्यानंतर सुद्धा प्रशासनाच्या सहाय्याने गुत्तेदार बोगस कामे करीत होता. सदरील सर्व कामे बंद पाडून आज .रोजी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील उपविभागीय कार्यालय देगलूर यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात बोगस कामे करनाऱ्या गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकून कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता लेंडी प्रधान प्रकल्प विभाग देगलूर यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी सबंध गावकऱ्याकडून करण्यात आली. गेल्या ३८ वर्षांपासून चिखल पाण्याला सोसल्यानंतर कसेबसे आम्ही पुनर्वसन रावणगाव खानापूर येथे राहायला आल्यानंतर चांगली व्यवस्था मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र इतकं गमावून सुद्धा परत चिखलातच राहावे लागत असेल तर यापेक्षा मोठे दुर्दैव नसावे. शिवाय ३८ वर्षापासून सोसणाऱ्या पिढीला पाहल्यानंतर सर्वच गावकऱ्यांना शिक्षित असल्याची पहिल्यांदाच लाज वाटली. शिवाय ही पिढी अन्याय सोसणारी नसून अन्यायाविरुद्ध लढणारी असल्याचे आज सिद्ध झाले. म्हणूनच की काय सबंध नवतरुण गावकरी एकत्रित आल्याने एक आगळा वेगळा बदल पाहायला मिळाला. तसेच दर्जेदार कामे नक्कीच होतील. अशी अपेक्षाही गावकऱ्यांनी केली.

# सत्ताधाऱ्यांकडून माध्यम स्वातंत्र्याची गळचेपी आणि करडी नजर

## मराठी पत्रकार परिषद पुरस्कार सोहळ्यात शरद पवार यांची टीका

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



सध्या दिल्लीसह देशभरात सत्ताधाऱ्यांची माध्यमांवर करडी नजर आहे. सत्ताधाऱ्यांविरोधात काही छापले गेले की, ताबडतोब फोन फिरवले जातात. माध्यमस्वातंत्र्याची अशी गळचेपी होण्याच्या काळात सत्ताधाऱ्यांना इंदिरा गांधींवर टीका करण्याचा नैतिक अधिकार खरेच आहे का? असा प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यातील आणि केंद्रातील सरकारवर टीका केली. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या पत्रकारितेतील विविध पुरस्कार प्रदान समारंभात ते बोलत होते. बुधवारी संध्याकाळी मुंबई मराठी पत्रकार संघात पार पडलेल्या या सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला जेष्ठ विचारवंत व अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख होते. परिषद अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवडे, कोषाध्यक्ष मन्सूर भाई शेख, डिजिटल मीडिया अध्यक्ष अनिल वाघमारे, महिला अध्यक्ष शोभा जयपूरकर आणि मुंबई पत्रकार परिषदेचे अध्यक्ष राजा अदाटे व विविध पदाधिकारी यांच्यासह पत्रकार आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात शरद पवार यांनी त्यांच्या ५७ वर्षांच्या सक्रिय राजकीय पत्रकारितेतील कारकिर्दीतील अनेक स्थित्यंतरांबद्दलची निरीक्षणे नोंदवली. आचार्य अत्रे, बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये, बाळासाहेब ठाकरे यांच्यासह आणखी दोघांसोबत केलेला मासिक सुरू करण्याचा निष्फळ प्रयत्न अशा अनेक आठवणी सांगताना पवार यांनी आणीबाणीच्या दिवसांवरही भाष्य केले. 'आणीबाणीच्या कालखंडात काही वृत्तपत्रांनी सरकारविरोधातील आपली नाराजी जाहीरपणे व्यक्त केली होती. अग्रलेखाची जागा मोकळी सोडत सरकारचा निषेध नोंदवण्यात आला होता. यथावकाश इंदिरा गांधींनी त्या कालखंडाची, निर्णयाची जाहीर माफी मागितली. लोकांनी त्यांचा पराभव केला. पुढे जनता सरकारच्या काळानंतर पुन्हा लोकांनी इंदिरा गांधी यांना निवडून देत माफ केल्याचेही दाखवून दिले. पण आता ५० वर्षांनी त्या गोष्टी उकरून काढल्या जात आहेत', असे पवार म्हणाले. 'सध्या दिल्लीतील केंद्र सरकारच्या काही उच्चपदस्थ नेत्यांकडे दरदिवशी वर्तमानपत्रांमध्ये काय छापून आले, याची बारकाईने चिकित्सा होते. ते सरकारच्या विरोधात असेल, तर संबंधितांना फोन केला जातो. वर्तमानपत्रांचा जाहिरातींचा ओघ कमी होतो. ही माध्यमांची गळचेपी करणाऱ्यांना इंदिरा गांधींवर टीका करण्याचा अधिकार नाही', असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला. बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार मिळवलेल्या मधुकर भावे यांनीही आपल्या ६० वर्षांच्या पत्रकारितेच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे उलगडून सांगत, सध्या पत्रकारांनी जागल्याची भूमिका घेत सतत व्यवस्थेला प्रश्न विचारले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. पत्रकारिता हा निखारा आहे. तो धगधगता तर ठेवायचाच, पण तसा तो ठेवताना आपला पदर न जळण्याची काळजीही पत्रकारांनी घ्यायची असते, असे ते म्हणाले. या सोहळ्याला डॉ. नरेंद्र जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात जेष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना 'बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्कार', ज्येष्ठ नाट्यकर्मी भरत जाधव यांना विशेष सन्मान, महेश म्हात्रे यांना 'आचार्य अत्रे स्मृती संपादक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याशिवाय विविध पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी अमय तिरोडकर, अभिजित कारंडे, पांडुरंग पाटील, सर्वोत्तम गावस्कर, दिनेश केळुसकर, श्रीमती सीमा मराठे, बाळासाहेब पाटील आणि श्रीमती शर्मिला कलगुटकर तर परिषदेचे सहप्रसिद्धी प्रमुख भरत निगडे यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विशाल परदेशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सुरेश नाईकवडे यांनी केले.